## योग प्रशिक्षकांना दाखविला घराचा रस्ता, निधीचे कारण

**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्हा परिषद आरोग्य विभागाने जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत ५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी योग प्रशिक्षकांना कामावरून कमी केले आहे. विशेष म्हणजे, आरोग्य विभागाने काढलेल्या आदेशात निधी नसल्याचे कारण देत हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. आरोग्य विभागाच्या या निर्णयामुळे योग प्रशिक्षकांमध्ये मात्र तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात मागील अनेक दिवसांपासून मनमानीपणे कारभार सुरू आहे. अशातच आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागातील आयुष्यमान आरोग्य केंद्रात मागील चार ते पाच वर्षांपासून कार्यरत असलेल्या योग प्रशिक्षकांना आरोग्य विभागाने अचानकच कामावरून कमी केले आहे. हा योग प्रशिक्षक यांना कामावरून कमी करताना आरोग्य विभागाने जारी केलेल्या आदेशात शासनाकडून या उपक्रमासाठी निधी उपलब्ध नसल्याने आपले योग सत्र स्थगित करण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. आरोग्य विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या ग्रामीण भागातील आयुष आरोग्य केंद्रात योगप्रशिक्षक म्हणून गत पाच वर्षांपासून कार्य केलेल्या प्रशिक्षकांचे काम बंद केले. यामुळे योग प्रशिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे.


**महासागर**

जिल्हा कार्यालय, गोंदिया

**जिल्हा प्रतिनिधी जयंत शुक्ला**

पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतीमा चौक, गोंदिया

संपर्क क्र ९८२२३८६९९९


# ५९३ रुपए भरून काढावा लागणार पिक विमा

**प्रतिनिधी / गोंदिया**

खरीप हंगामाला सुरूवात होवून महिना लोटला आहे. पीक विमाबाबत केंद्र शासनाने आदेश निर्गमित केले होते. मात्र किती पीक विमा, हा संभ्रम कायम होता. अशातच खरीप हंगाम २०२५ साठी पीक निहाय पिक निश्चित करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यात फक्त भातपिकासाठी पीक विमा निश्चित करण्यात आला असून प्रति हेक्टरी ५९२.५० रुपए भरून पिक विमा काढता येणार आहे. यासाठी विमा संरक्षित रक्कम ५९२५० चा




लाभ मिळणार आहे. पिक नुकसानीची माहिती दिल्यानंतर संबधित यंत्रणेकडून पंचनामा केला जाणार आहे. व त्यानंतर थेट रक्कम बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

शेतकऱ्यांकडून प्रति अर्ज एक रुपया भरून सर्वसमावेशक पीक विमा योजना आता बंद झाली आहे. आता नवीन योजनेत खरीप हंगामात तृणधान्य व कडधान्ये पिकांमध्ये प्रामुख्याने भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मूग, उडीद, तूर, मका या आठ पिकांचा समावेश आहे. तर रब्बी हंगामात गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, उन्हाळी भात या चार पिकांचा समावेश आहे. गळितधान्यांमध्ये खरीपात भुईमूग, कारळे, तीळ, सोयाबीन या चार पिकांसाठी तर रब्बीत उन्हाळी भुईमूग या पिकाचा समावेश आहे. नगदी पिकांमध्ये खरीपात कापूस व खरीप कांदा ही दोन पिके आणि रब्बी हंगामात रब्बी कांदा या पिकाचा समावेश आहे. गोंदिया जिल्ह्यात फक्त भातपिकासाठी पीक विमा निश्चित करण्यात आला असून प्रति हेक्टरी ५९२.५० रुपए भरून पिक विमा काढता येणार आहे. यासाठी विमा संरक्षित रक्कम ५९२५० चा लाभ मिळणार आहे. पिक नुकसानीची माहिती दिल्यानंतर संबधित यंत्रणेकडून पंचनामा केला जाणार आहे. व त्यानंतर थेट रक्कम बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

खरीपात पीक विम्यासाठी पीकनिहाय प्रतिहेक्टरी विमा संरक्षित रक्कम ही प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळी राहणार आहे. खरीपात विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के किंवा प्रत्यक्षात विमा दर हा दोन टक्क्यांपेक्षा कमी असल्यास जो कमी आहे तो विमा हप्ता भरावा लागणार आहे. या दरावरील प्रत्यक्ष असलेला विमा हप्ता हा केंद्र व राज्य शासनामार्फत विमा हप्ता अनुदान म्हणून विमा कंपनीस दिले जाणार आहे.

## अस्वलाने घेतला झाडावर आसरा

**प्रतिनिधी / गोरेगाव**

गोंदिया-कोहमारा महामार्गावरील जानाटोला येथील एका शेतशिवारातील एका झाडावर अस्वल झाडावर अस्वलाने आसरा घेतला असल्याची घटना शनिवारी (दि.२८) दुपारी उघडकीस आली. महामार्गावरून जाणाऱ्या काही नागरिकांना ही अस्वल झाडावर बसून असल्याचे आढळले.

त्यानंतर याची माहिती आजूबाजूच्या गावातील नागरिकांना होताच त्यांनी अस्वलाला पाहण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. हे शेत महामार्गालत असल्याने या मार्गावरुन ये-जा करणाऱ्यांनी देखील अस्वल पाहण्यासाठी गर्दी केली. या घटनेची माहिती मिळताच गोरेगाव वनविभागाची चमू घटनास्थळी दाखल झाली असून अस्वलीला रेस्क्यू करण्यासाठी मोहीम सुरु केली आहे.

## दृष्टिक्षेप

### दोन ट्रॅक्टरसह रेती जप्त

**गोंदिया :** रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत शिवनी ते निलज मार्गावर पोलिसांनी कारवाई करून ट्रॅक्टरसह रेती असा एकूण ६ लाख ६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीने ट्रॅक्टर क्र. एमएच. ३५/ ए.आर. ०६५१ मध्ये एक ब्रास रेती तेढवा येथील वैनगंगा नदीच्या पात्रातून भरून अवैधरित्या विनापास परवाना नेत असतांना शिवनी ते निलज मार्गावर दिसून आला. पोलिसांनी कारवाई करून ट्रॅक्टरसह रेती जप्त केली. फिर्यादी पोशि. हितेश लांजेवार यांच्या तक्रारीवरून रावणवाडी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. तर दुसऱ्या घटनेत डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत मौजा खोडकी शेत शिवार ते खोडशिवनी मार्गावर ट्रॅक्टरसह रेती असा एकूण ६ लाख ६५ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपीने ट्रॅक्टर क्र. एमएच. ३५/ एजी. ८८८६ मध्ये चुलबंद नदी पात्रातून एक ब्रास रेती अवैधरित्या विनापास परवाना नेत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी आरोपीला खोडशिवनी मार्गावर पकडून ६ लाख ६५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. फिर्यादी पोना. महेंद्र सोनवाने यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला आहे.

### राजश्री छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन

**गोंदिया :** छोटा येथील संविधान चौक येथील बोधिसत्व बुद्ध विहार येथे २६ जून रोजी आरक्षणाचे जनक राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात दरम्यान १० वी आणि १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात गौतम गजभिये, साक्षी कैलाश वैदे, प्राची सतीश मेभम, अनुज नरेंद्र बानेवार, तनुश्री शामराम गजभिये, क्षितीज अंकुश बनसोड, मयुरी कुंदन सुतकूर, गणेश बुधराम राऊत, निखिल विश्वास बोरकर, नरेंद्र बानेवार, नरेंद्र बानेवार, नरेंद्र बानेवार, रेहान बानेवार आदी उपस्थित होते.

### राजश्री शाहू महाराज जयंती साजरी

**अर्जुनी/मोर :** स्थानिक सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य जे.डी.पठाण तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य महेश पालीवाल, पर्यवेक्षक लोकमित्र खोब्रागडे, मुख्याध्यापिका कल्पना भुते, प्रा. नंदा नागपूरे, प्रा.टोपेश बिसेन आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.

## अपघातात इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत कोहमारा गोंदिया मार्गावरील मुरदोली गावाजवळ वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू झाल्याची घटना २५ जूनची आहे. हगरु यशवंत गेडाम (५५) रा. कोहळीटोला असे मृताचे नाव आहे.

मृतक हगरु गेडाम हा कोहळीटोला वरून कोडेबर्रा मंगेझरी येथे दुचाकी क्र. एमएच. ३५/झेड. ३२१५ ने जात असतांना, मुरदोली गावाजवळ वाहन क्र. एमएच. ०४/एआर. ०५५७ च्या चालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडके गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## गोंदियासह चार तालुके नक्षलग्रस्त,गृहविभागाचे परिपत्रक

**प्रतिनिधी / गोंदिया**

राज्यातून नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनासाठी शासन व प्रशासनाकडून पावले उचलली जात आहेत. जिल्हा नक्षलमुक्त करण्यासाठी पोलिस प्रशासन महत्वाची भूमिका बजावत आहे. जिल्ह्यात गत काही वर्षात नक्षल्यांची मोठी कारवाई नाही. तसा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला होता. या अनुषंगाने आज, २७ जून रोजी राज्याचे उपसचिव हेंमत महाजन यांनी पत्र जारी केला आहे. यात गोंदियातील चार तालुके तसेच संपूर्ण गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून नमूद केले आहे.

नक्षलग्रस्त भागाला मिळणाऱ्या सुविधा, योजना, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळणारे भत्ते कायम राहतील. राज्यातील काही भागांमध्ये नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढल्याने डिसेंबर २००४ व मे २००५ च्या शासन परिपत्राकान्वये राज्यातील जिल्हे, तालुके, गावे नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली होती. आढाव्याअंती वरील दोन्ही शासन निर्णय फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करुन नव्याने नक्षलग्रस्त जिल्हे व तालुके



घोषित करण्यात आले होते. तद्नंतर या शासन निर्णयास ५ एप्रिल २०१३ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली होती.

त्यानंतर २६ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हे, तालुके, गावे नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली होती. तथापि, या शासन निर्णयास १८ फेब्रुवारी २०१५ च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली. राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक लाभाच्या व बिगर आर्थिक लाभाच्या सवलती लागू करण्यात आल्या आहेत. सवलतींमध्ये कालानुरुप बदल करुन शासन निर्णयान्वये घोषित केलेले नक्षलग्रस्त भाग विचारात घेऊन सुधारित सवलतींचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने मंत्रीमंडळ मान्यतेसाठी ५ नोव्हेंबर २०२१ च्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर केला होता. बैठकीत केंद्र शासनाच्या नक्षलग्रस्त भागाच्या यादीनुसार तपासणी करुन नक्षलग्रस्त भागाचा फेरविचार करण्याच्या सूचना मंत्रीमंडळातील सदस्यांनी दिल्या होत्या.

त्या अनुसरुन राज्याचे पोलिस महासंचालकांच्याकडून राज्यातील नक्षलग्रस्त भागातील कारवायांसंदर्भात अहवाल शासनास सादर करण्यात आला. अहवालात नमूद बाबींचा विचार करून गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव तालुके व गडचिरोली जिल्हा संपूर्ण नक्षग्रस्त म्हणून घोषित करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यातून नक्षलवादाचा समूळ उच्चाटणासाठी पोलिस विभाग व शासनाकडून विविध मोहिम, उपक्रम राबविले जात आहेत. गत काही वर्षांपासून जिल्ह्यात नक्षल्यांची मोठी कारवाई नाही. तीन नक्षलवाद्यांनी समर्पन केले आहे. दोन नक्षल्यांना अटक आहे.

## मारुती चितमपल्ली यांना वनखात्याच्या वतीने आगळी वेगळी श्रद्धांजली

**प्रतिनिधी / नवेगावबांध**

वनविभागातील आपल्या सेवाकाळात सर्वाधिक काळ वास्तव्यास असलेल्या नवेगावबांध येथे वनमहर्षी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना वनविभागाच्या वतीने आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. चितमपल्लींच्या मृत्यूपत्रातील इच्छेनुसार त्यांच्या पावन अस्थी नवेगावबांध येथील नवेगावबांध तळ्यात विसर्जित करण्यात आल्या.



त्यांनी मृत्यूपत्रातून जांभूळझरी येथील माधवराव पाटलांच्या समाधी शेजारी स्मारक व्हावे अशी इच्छाही प्रदर्शित केली होती. चितमपल्ली यांचे संपूर्ण आयुष्य निसर्गाच्या सान्निध्यात, पशु-पक्षी-प्राणी यांचे जतन करण्यात गेले. पशुपक्ष्यांच्या अधिवासांचे जतन करण्याकडे त्यांचा ओढा असायचा. पशुपक्ष्यांचे आवडता आणि हक्काचा अधिवास म्हणजे वड आणि पिंपळ. कारण ह्या वृक्षांचे आयुष्य शेकडो वर्षांचे असते. हेच ध्यानात ठेवून माधवराव पाटलांच्या समाधी शेजारी वडाचे झाड लावून त्यांना वनखात्यातर्फे आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दिवंगत चितमपल्ली साहेबानांही जंगलात सिमेंट कॉंक्रिटची समाधी अपेक्षित नसणार अशी श्रध्दा ठेवून ही अनोखी श्रद्धांजली वाहण्यात आली.

सदर वृक्षारोपण श्रीलक्ष्मी वनसंरक्षक (प्रादेशिक), जयरामे गौडा क्षेत्र संचालक नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि पवन जोंग उपवनसंरक्षक, गोंदिया यांच्या पुढाकाराने अतुल देवकर (वन्यजीव नवेगाव-नागझिरा), अविनाश मेश्राम (सहा. वन संरक्षक), सदाशिव अवघान (वन परिक्षेत्र अधिकारी) व इतर अनेक वनकर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडले. यासाठी खास नागपूरहून चंद्रकांत रागीट, मारुती चितमपल्ली यांच्या बहुतांश पुस्तकांचे प्रकाशक मकरंद कुलकर्णी, तर वर्ध्याहून कौशल मिश्रा, एन व्ही हूड, अॅड.ताम्रध्वज बोरकर, बुद्धदास मिरगे, राजदीप राठोर, शाहरूख इनामदार व स्थानिक मान्यवर उपस्थित होते.


**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF AMGAON BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Amgaon Branch office located at **Kanta Chouk, Lanji Road, Taluka-Amgaon, District- Godia, Pin Code - 441902** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF ARJUNI MORGAON BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Arjuni Morgaon Branch office located at **Gurudev Nagar Agriculture Office, Taluka - Arjuni Morgaon, District- Godia, Pin Code- 441701** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF DEORI BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Deori Branch office located at **Bus Stop, Near SDO office, Taluka - Deori, Gondia, District- Godia, Pin Code- 441601** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF GONDIA -TEHSIL BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Gondia -Tehsil Branch office located at **Near Railway Station, Bidi Factory Gondia 441614** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF GONDIYA BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Gondiya Branch office located at **Shop No. 18 Ground Floor Rajlaxmi complex Gondia, District- Godia, Pin Code- 441614** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF GOREGAON BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Goregaon Branch office located at **Manadal agriculture office, Near Post office, Karanja, Taluka - Goregaon, District - Godia, Pin Code- 441801** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF SADAK - ARJUNI BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Sadak - Arjuni Branch office located at **Near Panchayat Samiti Road, Rao Office, Taluka-Sadak- Arjuni, District - Godia, Pin Code- 441807** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF SALEKASA BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Salekasa Branch office located at **Near Taluka Agriculture Office, Dongargadh Road, Salekasa - 441916** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**

**Universal Sompo General Insurance**
Suraksha, Hamesha Aapke Saath
**Universal Sompo General Insurance Co Ltd**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF TIRORA BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Tirora Branch office located at **Sant Sajjan Word, near NCP Office, Tirora, Gondia, Maharashtra, 441911** India would stand closed w.e.f closing business hours of Monday, August 30, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

**Head Administration**


## मुख्य अधिकारी, कार्यालय नगर परिषद, गोंदिया

ई-मेल:- chiefofficergondiya@gmail.com — दुरध्वनी क्र. 07182-23706

जा.क्र.नपगों/मुअ/बावि/352/2025 — दिनांक: 27/6/2025

### दुकान गाळे जाहीर लिलाव सूचना

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, गोंदिया नगर परिषदेच्या मालकीची गोविदपुर शाळेच्या आवारातील मुख्यरस्ता सन्मुख उत्तर मुखी असलेले 2 गाळे पुढील 03 वर्षा करिता ना-परतावा अधिमूल्य 01 मासिक भाडे पट्टी वर 03 वर्ष कालावधी करिता आंवटित करण्यासाठी महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगर परिषद (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम 1983, स्थायी निर्देश, शासन निर्णय, शासन परिपत्रके यामधील अटी व शर्ती वर अधिन राहुन दिनांक 8/7/2025 रोजी दिवस मंगळवार दुपारी ३ वाजता नगर परिषद कार्यालयाचे सभागृहात जाहीर लिलावाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | दुकानाचे ठिकाण | क्षेत्रफळ | प्रती मासिक भाडे | अधिमूल्य अनामत रक्कम | लिलावाचे स्थळ, वेळ दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोविदपुर शाळेच्या आवारातील मुख्यरस्ता सन्मुख उत्तर मुखी | 10X10 =100 चौ. फुट प्रत्येकी | 2500/- रुपये | 90,000/- रुपये | गोंदिया नगर परिषद कार्यालय च्या सभागृहात दिनाक :- 8/7/2025 दुपारी 03 वाजता |

**अटी व शर्ती**

1) लिलावात बोली बोलण्यासाठी रु.1,000/- अनामत रक्कम (ना-परतावा) नगर परिषदेकडे रोखीने दिनांक-7/7/2025 रोजी सांयकाळी 3 वाजे पर्यंत न.प. च्या मालमत्ता कर विभागात जमा करावी लागेल. आणि अनामत रक्कम जमा केल्याची पावती न.प. च्या बाजार विभागात दिनांक 7/7/2025 पर्यंत जमा करावी लागेल. लिलावाचे अनामत रक्कम भरल्या शिवाय भाग घेता येणार नाही, तसेच ज्या व्यक्तिची बोली मान्य झाली त्याची लिलावाची रक्कम परत मिळणार नाही, अयशस्वी बोली धारकाची अनामत रक्कम नियमानुसार परत करण्यात येईल.

2) नियोजीत दुकानगाळेचे लिलाव अनु. क्रमांक मुसार व प्रत्येक दुकान गाळे करिता स्वंतत्र पणे करण्यात येईल.

3. एकाव्यकतीस जास्तीस-जास्त एक दुकान गाळा घेता येईल.

4. ज्या बोली धारकाची अधिमुल्य अनामत रक्कम सर्वाधिक असेल त्यास ते दुकान गाळे भाड्याने देण्यात येईल.

5. अंतिम बोली नंतर दुकान गाळे निश्चित झाल्यानंतर 25% टक्के होणारी रक्कम अनामत रक्कम लिलाववाचे दिवसापासून 3 दिवासाचे आत भरावी लागेल. उर्वरित 75% टक्के रक्क्म एका महिन्याचे आत भरावी लागेल. त्याशिवाय दुकान गाळे ताब्यात मिळणार नाही.

6. सदर दुकान गाळेचे भाडे पट्याची मुददत 3 वर्षा करिता राहील, तदंनतर कलम 92(3) अन्वये नगर परिषदेच्या मान्यते नुसार भाडेपट्याचे नुतनीकरण करुन नगर परिषदेने ठरविले प्रमाणे आपल्या दुकान गाळे पुढील 06 वर्षासाठी भाडेपट्ट्याने देता येईल.

7. नगर परिषद व तत्सम भाडेपट्टाधारक यांचे दरम्यान स्वर्यस्पष्ट असलेल्या अटी व शर्तीच्या लेखी स्वरुपातील करारानामा योग्य मुल्याच्या स्टॅम्प पेपरवर करुन देणे बंधनकारक राहील. त्याशिवाय दुकान गाळे ताब्यात देता येणार नाही.

8. अंतिम बोलीनुसार अनामत निधीची रक्कम व मासिक भाडे बोली अंतिम निश्चित केल्यावर त्याप्रमाणे वार्षिक भाड्याची रक्कम अग्रिम भरल्यानंतरच भाडेपट्टे धारकास दुकान गाळयाचा ताबा देण्यांत येईल. त्यानंतरचे मासिक भाडे प्रत्येक महिन्याचा 25 तारखेचा आत नगर परिषद कार्यालयात जमा करावे लागेल. त्यामध्ये कसुर झाल्यास व्याजाची आकारणी करुन भाडे वसुल करण्यांत येईल.

9. कोणत्याही कारणास्तव भाडेपट्याची मुदत संपण्यापूर्वी दुकान गाळा सोडवयाचा असल्यास किमान तीन महिने आधी भाडेपधारकाने लेखी स्वरुपात नगर परिषद कार्यालयात कळवावे लागेल. त्याप्रमाणे तीन महिन्याचे भाडे भरण्याची जवाबदारी ही गाळेधारकाची राहील, अनामत निधिच्या रक्कमेमधून संपूर्ण थकबाकी वसुली करुन उर्वरित रक्कम परत करण्यांत येईल.

10. नगर परिषदेच्या अनुमतीशिवाय दुकान गाळयाच्या बांधकामात कोणताही बदल येणार नाही, अथवा दुकान तोडफोड करून बांधकाम करता येणार नाही तसेच वाढीव बांधकाम करता येणार नाही. दुकाना समोरील जाण्या-येण्याच्या जागेवर अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे बस्तुची माल साहित्याची मांडणी करता येणार नाही. किंवा रहदारीस अडथळा निर्माण करता येणार नाही.

11. लिलाव मध्ये भाग घेणाऱ्या बोलीधारकाच्या नावानेच भाडेपट्टा कायम करण्यात येईल. त्यांना परस्पर दुकान हस्तातरंण करता येणार नाही. तसेच पोट भाडेकरु ठेवता येणार नाही. तसे निर्देशनास आल्यास दुकानांचा ताबा घेणयाचा अधिकार न.प. मुख्याधिकारी यांचा अधिकार राहील.

12. दुकान गाळे धारकास विद्युत मिटर स्वखर्चाने घ्यावे लागेल विद्युत खर्च स्वतः करावा लागेल.

13. भाडेपट्टाधारकास दुकान भाडे व्यतिरिक्त नगर परिषदेला देय असलेल्या मालमत्ता कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर, व इतर शासकीय कराचा भरणा निर्धारित केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे भरावा लागेल.

14. भाडे कराराची मुदत संपल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणाने, अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे भांडेकरार संपुष्टात आल्या तारखेपासून भाडेकरुचा ताबा हा बेकायदेशिर व अनाधिकृत समजण्यांत येईल. अशा बेकायदेशिर व अनाधिकृत वापरासाठी भाडेकरुकडून नुकसान भरपाई या नगर परिषद अधिनियमाप्रमाणे दंड वसुल करण्यांत येईल. अथवा दुकानाचा ताबा घेण्याचा कायदेशिर हक्क नगर परिषदेला राहील.

15. सदर प्रमाणे निश्चित केलेल्या भाडधामध्ये प्रत्येक तिन वर्षाने 20 टक्के वाढ करण्यांत येईल. सदर वाढ ही निश्चित केलेल्या कालावधीकरिता राहील.

16. नगर परिषदेने मंजुरी दिल्यानंतरच गाळेधारकास गाळा हस्तांतरण करण्याची परवानगी देण्यांत येईल, यासाठी नियमाप्रमाणे आकाराण्यांस आलेली हस्तांतरण फी भरणे बंधनकारक राहील.

17. नगर परिषदेकडील कोणतीही थकबाकी असणाऱ्या बोलीधारकास लिलावात भाग घेता येणार नाही.

18. दुकानात दारु विक्री/जुगार साठी जागा वापरता येणार नाही.

19. कोणतीही बोली मंजूर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवलेला आहे. तसेच होणारा लिलाव तहकुब करण्याचा अथवा आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवलेला आहे.

मुख्य अधिकारी तथा
प्रशासक, नगर परिषद, गोंदिया

## बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला डॉ. राऊत यांची भेट

**गोंदिया :** आरोग्य संस्थेतील व्यवस्था, स्वच्छता व सुरक्षा, औषध उपलब्धता, वैद्यकीय सुविधा, रुग्णांसमवेत सुसंवाद याबाबत निर्देशकांची पाहणी करण्यासाठी २४ जुन रोजी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी तथा आमगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रोशन राऊत यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र बनगाव येथे आकस्मिक भेट देवून कामकाजाची पाहणी केली.

भेटी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र बनगाव येथील प्रसुतीगृह, प्रयोगशाळा, आंतररुग्ण वार्ड, औषधी साठा, लस साठवणुक केंद्र आदिची पाहणी करुन लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातुन सुधारणा करण्याच्या सुचना वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात आल्या. त्यात प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्रातील आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता नियमितपणे करणे, सर्व कर्मचाऱ्यांनी बायोमेट्रिक हजेरी नोंदविणे, बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) दरम्यानच्या वेळेत रुग्णांना वेळेत चांगल्या सोयी देण्यात याव्यात,क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी नियमित गावनिहाय भेटीचे नियोजन करणे, पर्यवेक्षांनी उपकेंद्रांना भेटी देवुन सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेण्यात यावा, हलचल रजिस्टरवर नोंदी करुनच मुख्यालय सोडावे. सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यात यावी. कर्मचारी यांनी कर्तव्यस्थानी ओळखपत्र व ड्रेस कोड नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, जैविक घन कचरा व्यवस्थापन योग्य करणे, कुपोषित अंगणवाडीतील बालकांचे तपासणी करुन कुपोषित बालकांना श्रेणीनुसार वर्गीकरण करुन आवश्यक तो आहार देण्यात यावा, टेलिकंन्सल्टेशन सेवेचे सामुदायिक आरोग्य अधिकारी मार्फत योग्य नियोजन करणे, गरोदर मातेला प्रसुतीपुर्व व प्रसुतीपस्चात नियमित सेवा देणे, पत्ता सिजन स्थलातंरित लोकांची आरडीके किट ने मलेरिया बाबत तपासणी करणे, अंगणवाडीतील बालकांची नियमित तपासणी, स्टॉप डायरीया अनुषगांने गावपातळीवर हात धुण्याचे प्रात्यक्षिक अंगणवाडी व शाळेमध्ये देणे, आरोग्य संस्थेत ओआरटी कॉर्नर स्थापित करणे व आरोग्य विषयक जनजागृती साहित्य लोकांना दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे बाबत विविध सुचना दिल्यात.

# हिवतापाला झिरो करण्यासाठी आरोग्य संस्थेची वारी

**गोंदिया :** पावसाळा सुरु झाल्याने किटकजन्य आजार जसे हिवताप,डेंगू यासारखे आजार डोके वर काढण्याची शक्यता असते.राज्यात गोंदिया जिल्हा हिवतापाबाबत संवेदनशील जिल्हा म्हणुन घोषित केलेला आहे.गोंदिया जिल्हा हा भात शेतीसाठी प्रसिद्ध आहे.भात शेतीसाठी पाणीयुक्त चिखलची गरज भासते तसेच तलावांचा जिल्हा म्हणून वेगळी ओळख आहे.तसेच जंगलव्याप्त भाग, घनदाट झाडी व झुडपे यामुळे डास व डास अळीसाठी पोषक वातावरण असते.जिल्ह्यात बाराही महिने हिवताप आजाराचे रुग्ण निघत असतात.त्यामुळे हिवतापाचा जर प्रसार रोखायचा असेल तर मच्छरांसोबत डास अळी सुद्धा नष्ट करणे गरजेचे बनलेले आहे.

त्या अनुशंगाने हिवतापाला झिरो करण्यासाठी दि.२४ जुन रोजी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी एकाच दिवशी तिरोडा तालुक्यातील दोन पीएचसी त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र वडेगाव व ईंदोरा व आरोग्यवर्धिनी उपकेंद्र गोंडमोहाडी येथे आकस्मिक भेटी देवुन कामकाजाची पाहणी केली.त्यावेळी त्यांचे सोबत हिवताप विभाग कार्यालयातील पर्यवेक्षक सोबत होते.



पावसाळ्यात जलजन्य व किटकजन्य आजार जसे हिवताप व डेंग्युची रुग्ण संख्या कमी करण्यासाठी आरोग्य कर्मचारी यांचे प्रबोधन करणे,नियमित गृहभेटी सर्वेक्षण पडताळणी, तालुकास्तरीय हिवताप कार्यशाळेतुन आरोग्य सेवक,आरोग्य सेविका,आशा सेविका यांना प्रशिक्षित करणे,डासांची पैदास रोखण्यासाठी गावपातळीवर ग्रामपंचायतीचे उपाययोजना, गावात आरोग्य कर्मचार्यामार्फत करण्यात येत असलेले प्रतिबंधात्मक उपाययोजनेची पाहणी, हिवतापाबाबतचे होणारे पर्यवेक्षण,जैविक बाबी,प्रौढ डास कमी करण्याचे विविध पद्धती, हिवताप दुषित रुग्णांना त्वरित उपचार मिळत आहेत की नाही याची खात्री करणे,मलेरियाच्या डासांची उत्पत्ती थांबवण्यासाठी उपाययोजना,रक्त चाचण्या, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपायांशी संबंधित नोंदी अद्यावत ठेवण्याची तपासणी करणे.नवीन आणि उपचारांच्या पद्धती विषयी मार्गदर्शन करणे.आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक असलेले औषधं, रक्ताच्या तपासणीसाठी स्लाइड्स,रॅपिड डायग्नोस्टिक किट आणि इतर आवश्यक साहित्य बाबीची उपलब्धता ,डासअळी नाशक पद्धती अशा विविध बाबींसाठी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांचेमार्फत जिल्ह्यातील आरोग्य संस्थाना भेटी देण्यात येत आहे.

डॉ.चव्हाण यांनी भेटीच्या वेळी पत्तासिजन व स्थलातंरित लोकांची आरडीके किट ने मलेरिया बाबत तपासणी करणे,सद्य स्थितीत सुरु असलेला फवारणी कार्यक्रम अंतर्गत गुणवतापुर्ण फवारणी करुन पर्यवेक्षण करणे,किटकजन्य आजाराबाबत जनजागृती साहित्य लोकांना दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे बाबत विविध सुचना दिल्यात. भेटी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी डॉ.पलास शहारे,डॉ. आदित्य दुबे यांचेसह आरोग्य संस्थेतील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका,आशा सेविका यांचे सह ईतर स्टाफ व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## ब्लॉसम पब्लीक शाळेत अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा



**देवरी :** ब्लॉसम पब्लीक स्कुल येथे जागतीक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात गोंदिया पोलिस दलाचे विशेष सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रमाला मपोउपनि गीता मुळे, हेमंत मस्के, विनोद बिसेन, नंदेश्वर, प्राचार्य डॉ.सुजित टेटे मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी गोंदिया पोलीस दलाच्याच्या विशेष सहकार्याने करण्यात आले. पोलिस विभागाच्या वतीने अंमली पदार्थ सेवण केल्याबद्दल होणारे दुष्परिणामावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली. संचालन शिक्षिका वैशाली मोहुर्ले व सरिता थोटे यांनी केले. आकांक्षा डिब्बे, नितेश लाडे यांच्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पोलिस विभागाचे अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आणीबाणी काळात लढा देणाऱ्या व्यक्तींचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देऊन गौरव



**गोंदिया :** २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या काळात देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी लढा देणाऱ्या आणि त्या संघर्षात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांचा आज सन्मान करण्यात आला. नवीन प्रशासकीय इमारत जयस्तंभ चौक येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते हा गौरव सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या संघर्षयात्रींचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी त्यांचा गौरव केला. यावेळी काही वयोवृद्ध लढवय्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या आसनस्थळी जाऊन सन्मानित केले. या कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बहिरे, तहसीलदार समशेर पठाण, अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे उपजिल्हाधिकारी शुभम पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे तसेच जिल्ह्यातील विविध संघर्ष सैनिक व त्यांच्या वारसदारांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात सन्मानपत्र आणि कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून शोभेलाल आत्माराम बोपचे, बेनीराम हरिराम कटकवार, कुशीलाल उकाजी रहांगडाले, बुधराम झाडू काटेखाये, साधुराम भिवराम ठाकरे, भैयालाल बिसनजी मानकर, हरीराम मोतीराम करंडे, घनश्याम भागवत डोये, गोवींदराव रामलाल पुंडे, गोपीचंद दादुजी पटले, नारायन केशरीचंद कटकवार, सुधाकर देवराव रानडे, धनलाल हिरूद उईके, घनश्याम उदयराम अग्रवाल, राम दिनकरराव टोळ, त्रिलोकीनाथ शिवदत्त शर्मा, भगीरथ छोटेलाल यादव, मधुकर विठलराव ढोके, इंद्रराज ताराचंद ठाकुर, मधुकर मनाजी दुनेदार, संभु आडकु नाकाडे यांचा गौरव करण्यात आला.

## मिसपिरी येथे आरोग्य तपासणी व जनजागृती शिबीर संपन्न



**गोंदिया :** जिल्ह्यात धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ४९ गावात राबविण्यात येत आहे. त्यातंर्गत मिसपिरी येथे २५ जुन रोजी ग्रामपंचायत मिसपिरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी येथे आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून आरोग्य तपासणी व जनजागृती करण्यात आली.

आरोग्य मेळाव्याचे उदघाटन पंचायत समिती सदस्य अनुसयाताई सलाम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मिसपिरीचे सरपंच रसवंती उसेंडी, उपसरपंच जीवनजी सलामे, ग्रामसेवक अंबादे, प्रा.आ.केंद्र ककोडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.रामटेके, भरारी पथकाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद कुकडे, आरोग्य सेविका एस.एस.थोटे व एम.आर.लंजे, आरोग्य सेवक एस.एस.टेंभुर्णे, कार्यक्षेत्रातील आशा गटप्रवर्तक व आशा सेविका यांनी उपस्थिती राहुन आरोग्य सेवा दिली. यामध्ये शासनाच्या सर्व विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडीच्या वतीने आरोग्य विभागाचा स्टॉल लावण्यात आला. या ठिकाणी अंसासर्गिक कार्यक्रमाच्य अनुशंगाने रक्तदाब व मधुमेह तपासणी, सिकलसेल तपासणी, रक्तगट सोबतच गरजु लोकांची वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत आरोग्य तपासणी व समुपदेशन करुन औषधोपचार करण्यात आला. आरोग्य विभागाच्या जनजागृती स्टॉल मध्ये क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, हिवताप, स्टॉप डायरीया, मलेरिया व इतर राष्ट्रीय कार्यक्रमाच्या बॅनर व पोष्टरच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचे सुयश



**तिरोडा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाने घेतलेल्या इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतीम निकाल २५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत श्री पब्लिक स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. दरम्यान त्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करते. या शिष्यवृत्तीचा उद्देश महाराष्ट्रातील सरकारी आणि खाजगी शाळांमधील शैक्षणिकदृष्ट्या पात्र विद्यार्थ्यांना मदत करणे आहे. यानुरूप श्री पब्लिक स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. यामध्ये इयत्ता पाचवीचे विद्यार्थी अवनी विलास मून, आश्लेषा किरण कुमार गोबाडे, पूरब गणेश खोब्रागडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यासाठी श्री पब्लिक स्कूल तिरोडाचे संस्थापक रामकृष्ण शेंडे आणि मुख्याध्यापक राधा कृष्ण शेंड आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## लोहिया विद्यालयात जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा



**सडक अर्जुनी :** लोहिया शिक्षण संस्था द्वारा संचालित रामेश्वरदास जमनादास लोहिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व जमुनादेवी लोहिया प्राथमिक शाळा सौंदड यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आ.न.घाटबांधे होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाच्या प्राचार्य उमा बाच्छल, डुग्गीपारचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली पवार, पोलिस कर्मचारी यु.एस.रुखमोडे, विद्या ठाकूर, एस.जी.इंगळे, मुख्याध्यापक मनोज शिंदे, पर्यवेक्षिका कल्पना काळे, प्रा.आर.एन.अग्रवाल, डी.एस.टेंभूर्णे उपस्थित होते. याप्रसंगी सहायक पोनि रूपाली पवार यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाच्या अधीन जाऊन आपल्या जीवनाची दुर्देशा करू नये, असे मार्गदर्शन केले. पोहवा विद्या ठाकूर, प्राचार्य यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु.यु.बी.डोये यांनी तर आभार पर्यवेक्षिका कल्पना काळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## १०० वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

नवेगावबांध : पर्यावरण संवर्धनासाठी बालवयातच ठाम निर्धार करणारी आणि प्रेरणा देणारी घटना गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात घडली आहे. कुमारी आयुर्धा सुनील तरोने हिने आपल्या ११ व्या वाढदिवसानिमित्त १०० झाडे लावण्याचा संकल्प केला असून, विशेष म्हणजे ही झाडे फक्त लावायचीच नाहीत, तर ती जगवण्याचाही तिने आणि तिच्या वडिलांनी निर्धार केला आहे.

नवेगावबांध येथील ग्रीन पार्क हॉटेलमध्ये २४ जून रोजी तिच्या वाढदिवसाचा छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयुर्धा ने एका वृक्षारोपणाने आपल्या संकल्पाची सुरुवात केली. या उपक्रमात तिचे वडील सुनील तरोने, आई, आजोबा-आजी, बहीण तसेच कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा रामटेके, नवेगाव बांध फाउंडेशनचे सचिव तथा पत्रकार रामदास बोरकर,



पत्रकार बबलु मारवाडे आदी मान्यवरांनी देखील उपस्थिती लावून या उपक्रमाचे कौतुक केले.

नवेगावबांध परिसराच्या पर्यटनविकासात सुनील तरोने यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. त्यांनी 'ग्रीन पार्क' हॉटेलच्या माध्यमातून परिसराचा कायापालट केला असून, आज पर्यटकांची संख्या वाढत आहे. हॉटेलमध्ये भोजन, निवास आणि मुलांसाठी खेळाच्या सुविधाही निर्माण केल्या आहेत. याशिवाय शासनाच्या ताब्यात असलेल्या मोडक्या परिसरांचे रूपांतर पर्यटन स्थळांमध्ये करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे, या उपक्रमामागे शासनाच्या महसूल विभाग जलसंपदा विभाग वनविभाग वन्यजीव विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य तसेच नवेगाव बांध फाउंडेशनचे सचिव रामदास बोरकर नवेगाव बांध फाउंडेशनचे अध्यक्ष विजय डोये यांचे मार्गदर्शन आणि सक्रिय पाठबळ आहे. नवेगाव बांध येथील ज्येष्ठ नागरिक व तरुण मित्र मंडळ तसेच पर्यटन प्रेमींचा सहकार्य आणि मार्गदर्शन व मदत मिळत असल्याने हे कार्य सुरळीत होत आहे.

## तेढा येथे सापाला जीवदान



**गोरेगाव :** तालुक्यातील तेढा येथील किशोर मेश्राम यांच्या राहत्या घरी अचानक धामन प्रजातीचे साप दिसून आले. लागलीच मेश्राम यांनी सर्पमित्राला यांची माहिती दिली. दरम्यान सर्पमित्र हर्ष शेंडे यांनी मेश्राम यांचे घर गाठून धामन प्रजातीच्या सापाला पकडून सुरक्षित ठिकाणी सोडून दिले.

तेढा येथील रहिवासी किशोर मेश्राम यांच्या घरी साप दिसून आला. दरम्यान एकच धास्ती निर्माण झाली. याची माहिती सर्पमित्र हर्षल शेंडे यांना देण्यात आली. सर्पमित्र हर्षल शेंडे यांनी किशोर मेश्राम यांचे घर गाठून त्या सापाला सुरक्षित पकडले. सदर साप धामन प्रजातीचा असल्याचे समजुन आले. दरम्यान त्या सापाला सुरक्षित ठिकाणी सोडून देण्यात आले.

## जागतिक योग दिन साजरा



**गोंदिया :** येथील विद्या निकेतन अणि योग मित्र परिवार तर्फे शास्त्री वार्ड येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. योग दिन कार्यक्रमात उपस्थितांना योगाचे महत्व, सांगण्यात आले. याप्रसंगी रासेयो प्रमुख प्रा.गजानन तरोने, बुरदे, टिकरीया, शेंडे, चांदेकर, लंजे, कुंभलकर, रंगारी, प्रभु कापसे, बनकर, भोंडे आदि उपस्थित होते. याप्रसंगी योगाचे धडे देण्यात आले.

# विद्यार्थ्यांनो अंमली पदार्थाचे सेवन टाळा : अमित वानखेडे

### अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा : पोलिस विभाग व मेरिटोरियस पब्लिक स्कूलतर्फे पथनाट्यातून जनजागृती

**तिरोडा :** अंमली पदार्थाचे सेवण हे आरोग्यासाठी अपायकारक आहेत. अंमली पदार्थाचे अनेक दुष्परिणाम आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थाचे सेवन टाळावे, जीवनात यश संपादन करावयाचे असेल तर निरोगी आणि व्यसनमुक्त राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन तिरोडाचे पोलिस निरीक्षक अमित वानखेडे यांनी केले.

अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पोलिस विभाग व मेरिटोरियस पब्लिक स्कूलतर्फे पथनाट्याचे आयोजन करून जनजागृती करण्यात आली. दरम्यान आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन



करताना पोनि वानखेडे बोलत होते.

मेरिटोरियस पब्लिक स्कूल व तिरोडा पोलिस स्टेशनच्या वतीने अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त राणी अवंतीबाई चौक, बाजार चौक मुंडिकोटा येथे पथनाट्याचे आयोजन करून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला तिरोडा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अमित वानखेडे, मेरिटोरियस पब्लिक स्कूलचे संचालक मुकेश अग्रवाल, प्राचार्य प्रफुल तिवारी, शिक्षक संजय परिहार, पोलिस कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी स्कूलचे संचालक मुकेश अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांचे फक्त शैक्षणिक विकास नव्हे तर त्यांचे सामाजिक व नैतिक शिक्षणसुद्धा महत्त्वाचे आहे, असे व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्यातून अत्यंत प्रभावी पद्धतीने अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या युवकाचे जीवन कसे उद्ध्वस्त होते, त्याच्या कुटुंबावर त्याचे काय परिणाम होतात आणि नशा सोडल्यावर आयुष्य कसे पुन्हा नव्याने फुलू शकते, हे अत्यंत संवेदनशीलतेने आणि अभिनय कौशल्याने सादर केले.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

